स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

नांदेड सामाजिक विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी
पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा
प्रारुप आराखडा (Synopsis)

:: संशोधन विषय ::

"राष्ट्रीयकृत बँकांच्या पीक कर्ज योजनेमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक कल्याणात होणारी वाढ, विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा, कालावधी २००१ ते २०१५"

संशोधक

माधव बाबाराव हळदेकर
सामाजिक शास्त्र संकूल,
स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बी.बी.पावडे प्राचार्य,

के.आर.एम महिला महाविद्यालय

ता.जि.नांदेड

मार्च - २०१६

प्रस्तावना :-

कृषी हा व्यवसाय मानवी उत्क्रांतीतील एक महत्वाचा टप्पा आहे. मानवी सभ्यतेमध्ये विकासाच्या वाटचालीत कृषी व्यवसाय हया टप्प्याने महत्वाची भूमिका पार पाडली आहे. ती आजपर्यंत सुरुच आहे. सुमारे 11000 वर्षापुर्वी आदी मानवाच्या हे लक्षात आले की, झाडावरुन जमिनीवर पडणारे बियाणे खाली पडल्यावर वातावरणामुळे रुजते व उगवते आणि त्यातुनच वनस्पतीची वाढ होते. यावरुनच अन्नधान्य पुरवठा हा कृषी व्यवसायातूनच होतो आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती कृषी व्यवसायातूनच शक्य आहे.

भारत हा सुध्दा कृषीप्रधान देश असून प्राचीन काळापासुन भारतातील शेतीला ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक असे वेगळे महत्व प्राप्त झाले आहे. आणि हया कृषीला प्राप्त झालेल्या महत्वाच्या संदर्भात विवेचन करताना मगध काळात **“गौतम बुध्दांनी”** कृषी व्यवसायाचा मंत्र समाजाला दिला होता. तर मौर्य काळात इ.स.पूर्व 321 ते 300 मध्ये कौटील्याने **“कौटील्याचे अर्थशास्त्र”** हया आपल्या ग्रंथाची मांडणी केली त्यात त्यांनी कृषी क्षेत्राचे विवेचन करुन कृषी व्यवसायाला महत्वाचे स्थान असून भारतीय शेतीला उत्क्रांतीचा मौलीक इतिहास आहे. अशा या मौलीक भारतीय कृषीच्या इतिहासाचा अभ्यास केल्यास आपणास असे लक्षात येते की, प्राचीन काळापासुन कृषी हे भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रमुख क्षेत्र असुन अन्नधान्य उत्पादन, रोजगार निर्मिती, कृषी मालाची निर्यात, उपभोगाची गरज भागविणे, उद्योगासाठी लागणारा कच्चा माल, घराचा प्रश्न, घरासाठी लागणारे लाकुड, म्हणजेच झाडांची निर्मिती, त्यापासुन मध, मेण, डिंक इत्यादी महत्वाचे व्यवसाय तसेच पशुपालन उद्योगाला पुरक, सजीवांसाठी लागणारे पाण्याचे साठे, जमिनीतच आहेत. म्हणेजच सर्व सजीवांचा जीवन आधारच कृषी आहे. कृषी शिवाय मानवाच्या मूलभुत गरजाच पूर्ण होऊ शकत नाहीत. म्हणुनच भारतीय शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यासाठीच भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणुन ओळखली जाते. तर भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे योगदान

महत्वाचे असून देशाच्या एकुण लोकसंख्येपैकी सुमारे 64.3 टक्के लोकसंख्या ही शेतीशी व ग्रामीण क्षेत्राशी निगडीत असून सुमारे 54 टक्के लोकांना कृषी क्षेत्र रोजगार पुरविते.

भारतातील बहुसंख्य लोकसंख्या आजही रोजगार व आपल्या उपजीविकेसाठी कृषी क्षेत्रावर आधारित आहे. आणि देशाच्या आर्थिक विकासासाठी कृषी क्षेत्र इतर सेवा व उद्योग क्षेत्रापेक्षा महत्वाचे ठरते. कारण उद्योग क्षेत्रासाठी लागणाऱ्या कच्चा मालाची पुर्तता ही कृषी क्षेत्रातुन होते. तर कृषी क्षेत्रासाठीची कृषी आदानेही उद्योग क्षेत्रातून पुरविली जातात व भारतासारख्या विकसनशील देशाला विकसित होण्याच्या मार्गावर वाटचाल करीत असताना स्थैर्यासह आर्थिक विकासाची पुर्तता होण्यासाठी कृषी क्षेत्र हे अतिशय महत्वाचे ठरते. मात्र अलिकडील काळात कृषी क्षेत्राचा विकास हा उद्योग व सेवा क्षेत्राप्रमाणे होत नाही. याउलट कृषी क्षेत्राचा अर्थव्यवस्थेच्या एकुण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा घटत्या दराचा आहे. ज्यात वर्ष 1950 -51 मध्ये अर्थव्यवस्थेच्या एकुण राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा 53.1 टक्के ऐवढा होता वर्ष 1970 - 71 मध्ये 42.3 टक्के ऐवढा होता व वर्ष 1990 -91 ला हा वाटा 29.6 टक्के ऐवढा तर 2010 - 11 मध्ये हा पुन्हा घटून 14.5 टक्के ऐवढा होता तर आज तो 2012 - 13 नुसार 14.1 टक्के ऐवढा आहे. आणि हे भारतासारख्या विकसनशील देशाला परवडण्यासारखे नाही. कारण कोणत्याही देशाचा आर्थिक विकास होत असताना त्या देशाच्या कृषी क्षेत्रातील वाटा हा घटत्या स्वरुपाचा असतो; हे जरी सत्य असले तरी भारताच्या बाबतीत हे सत्य पुर्णतः स्विकार करता येत नसून भारत हा विकसनशील देशाच्या क्रमवारीत असून त्या वाटचालीसह भारतासमोर, भारतीय कृषी क्षेत्रासमोर अनेक समस्या आव्हाने उभे आहेत. त्यात उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास, वाढती लोकसंख्या, वाढत्या लोकसंख्येनुसार, रोजगार निर्मितीची समस्या, वाढत्या लोकसंख्येनुसार दारिद्रयात वाढ, वाढत्या लोकसंख्येनुसार अन्नधान्य पुरवठयाची समस्या इत्यादी महत्वपुर्ण समस्या होत. आणि हया समस्या देशाच्या आर्थिक विकासातील अडथळे असून त्यावर उपाययोजना म्हणुन कृषी क्षेत्राकडे मूलभूत क्षेत्र म्हणुन पाहणे आवश्यक ठरते. प्रत्येक देशाच्या सर्वांगीण विकासात कृषी हे महत्वपुर्ण भुमिका पार पाडत असते. ज्यात भारताच्या विकासातही भारतीय शेतीने महत्वाची भुमिका पार पडली आहे मात्र अलिकडे भारतीय शेतीचा विकास इतर क्षेत्राप्रमाणे होत नाही. त्यासाठी कृषी क्षेत्रातील घटत्या

विकास दराची कारणे कोणती ? भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 1951 पासुन आर्थिक नियोजनाला सुरुवात केली. त्या नियोजन काळापासून ते आतापर्यत भारतीय कृषीचा सर्वागीण विकास झाला आहे का ? इतर उद्योग, सेवा क्षेत्राप्रमाणे होणाऱ्या गुंतवणुकीच्या प्रमाणात कृषी क्षेत्रात किती गुंतवणुक झाली आहे. स्वातंत्र्यानंतर भारताव्दारे कृषी क्षेत्रातील विकासासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. त्यात भूमी सुधारणा कार्यक्रम, राष्ट्रीय कृषी विकास योजना, राष्ट्रीय कृषी विमा योजना, शेतकऱ्यांसाठी कर्ज माफी योजना, किसान क्रेडिट कार्ड योजना इत्यादी महत्वपुर्ण योजना कृषी क्षेत्राच्या विकासासाठी असल्या तरी कृषी क्षेत्र हे आजही मागासलेले आहे.

कृषी क्षेत्राचा विकास होण्यासाठी आणखी अधिक वित्त पुरवठयाची आवश्यकता आहे. वित्तपुरवठा हा शेती विकासासाठी आवश्यक घटक आहे. शेतकऱ्याला त्याच्या दारिद्रयामुळे, कर्जबाजारीपणामुळे इतर व्यवसायाप्रमाणे कृषी क्षेत्राला नियमितपणे व गरजेनुसार, वित्तपुरवठा होत नाही आणि बँकासुध्दा इतर व्यवसायाप्रमाणे कृषी क्षेत्राला वित्तपुरवठा करीत नाही तर बँका इतर ज्या पध्दतीने कर्ज, वित्तपुरवठा करतात त्यात पीक कर्ज योजना ही एक योजना आहे. ह्यामुळे कृषी क्षेत्राला शेतकऱ्यांला थोड्या प्रमाणात आधार मिळाला आहे. म्हणुन राष्ट्रीयकृत बँकाच्या पीक कर्ज (crop loan) योजनेमुळे कृषी व्यवसाय धारकांच्या आथिक विकासात वाढ होते. किंवा नाही. तसेच राष्ट्रीयकृत बँकाकडुन मिळालेल्या पीक कर्ज रक्कमेचा वापर कृषी व्यवसाय धारक किंवा शेतकरी योग्य पध्दतीने करतात का ? राष्ट्रीयकृत बँकाकडुन होणारा कर्ज पुरवठा परिपुर्ण आहे काय ? तर भारतीय शेतीची पध्दती ही परंपरागत पध्दतीने कसण्याची आहे त्यामुळे तिची उत्पादकता कमी आहे. कारण 1951 -56 मध्ये भारताची भात हया पिकाची प्रतिहेक्टर उत्पादकता ही 8 क्विंटल ऐवढी होती पुढे ती 1961 - 65 मध्ये 10 क्विंटल आणि 1985 - 86 ला ती 16 क्विटंल ऐवढी होती. त्यामाने जपान हया देशाची उत्पादकता ही 1951 ला 26 क्विंटल तर 1961-65 ला 33 क्विटंल व 1985-86 मध्ये 42 क्विटंल ऐवढी होती. आणि वरील वर्षाक्रमानुसार अमेरिकेची उत्पादकता 19 क्विंटल 29 क्विंटल 42 क्विंटल अशी होती. तर भात हया पिकासह गहु, व कापुस हया पिकांची भारतातील उत्पादकता ही इतर देशाच्या तुलनेत कमीच आहे. म्हणुन हया उत्पादकतेत वाढ होण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकाच्या पीक

कर्जाची आवश्यकता आहे काय ? व राष्ट्रीयकृत बँकाच्या पीक कर्ज योजनेचा ज्या शेतकऱ्यांनी लाभ घेतला त्यांच्या आर्थिक विकासात, कल्याणात वाढ झाली आहे काय ? हया वरील सर्व कारणांचा प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनाद्वारे करण्यात येणार आहे. आणि राष्ट्रीयकृत बँकाच्या पीक कर्ज योजनेमुळे कृषी व्यवसाय धारकांच्या आर्थिक कल्याणात वाढ होतांना त्यात अडचणी कोणत्या स्वरुपाच्या येत असतात ? तसेच पीक कर्ज योजनेचा अधिक लाभ मिळून कृषी क्षेत्रात कशा पध्दतीने बदल, विकास करता येईल ? इत्यादींचा अभ्यास करुन त्या सदंर्भात शिफारशी करणे हा या संशोधना मागील मुळ उद्देश आहे.

संशोधनाचे महत्व / गरज :-

शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी कृषी क्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे. त्यामानाने गेल्या दशकांपासून कृषी क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष दिल्यास आपणास असे आढळून येईल की, भारतीय कृषी क्षेत्राच्या विकासात वाढ झाली आहे. आणि हे सत्य नाकारता येत नाही, मात्र अलिकडील काळात भारतीय कृषी क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी असून त्यात उद्योग क्षेत्राला लागणाऱ्या कच्चा मालाची अधिक पुर्तता करणे, वाढत्या लोकसंख्येस अन्नधान्य व रोजगार पुरविणे ज्यातुन देशातील ग्रामीण भागातील दारिद्रयाचे प्रमाण कमी करण्यास मोलाची भूमिका निभावणे, इत्यादी महत्वपुर्ण समस्यांमुळे भारताचे कृषी क्षेत्र अनेक पातळयांवर आजही झ ागडताना दिसत आहे. वरील आव्हाने भारतीय कृषी क्षेत्राला समर्थपणे पेलता यावी. यासाठी शेतीचा विकास, देशातील संपुर्ण कृषी क्षेत्राचा विकास, त्यातुन देशाचा सर्वांगीण विकास हे तत्व लक्षात घेवून, कृषी क्षेत्रात अधिक गुंतवणुक करण्याची अधिक आवश्यकता आहे. कारण शेतकरी हा गरीब असून त्याच्याकडे शेतीत सुधारणा करण्या इतपत कुवत नसल्यामुळे कृषी क्षेत्राचा अधिक व परिपुर्ण विकास खुंटला आहे. म्हणुनच कृषी क्षेत्रास वितपुरवठा होणे आवश्यक आहे व त्यानुसारच कृषी क्षेत्रात आर्थिक वित्तपुरवठा गुंतवणुकीच्या स्वरुपात केला जातो, ज्यात वित्तपुरवठा हा संघटीत आणि असंघटित हया दोन क्षेत्राद्वारे केला जात असून, संघटीत क्षेत्रात सहकारी बँका, पतसंस्था, व्यापारी बँका, क्षेत्रीय ग्रामीण

बँका, नाबार्ड इत्यादी तर असंघटित क्षेत्रात - सावकार, नातेवाईक, मित्र, जमिनदार, सराफ इत्यादींचा समावेश होतो. अशा दोन्ही क्षेत्रांपैकी संघटित क्षेत्रातील राष्ट्रीयकृत बँकातर्फे कृषी क्षेत्राच्या विकासासाठी विविध कर्ज योजनांच्या माध्यमातून वित्तपुरवठा केला जातो. ज्यात किसान क्रेडिट योजना, शेतीमाल तारण कर्ज, शेतीसाठी सोने तारण कर्ज, फळबाग विकास योजना, पीक कर्ज योजना इत्यादी, विविध योजना असुन हया विविध योजनांपैकी राष्टीयकृत बँकाच्या पीक कर्ज योजनेचा अभ्यास करणे, आणि राष्ट्रीयकृत बँकाच्या पीक कर्ज योजनेमुळे कृषी क्षेत्राच्या विकासात होणाऱ्या बदलाचा, तसेच बिलोली तालुक्यातील पीक कर्ज योजनेचा लाभ घेणाऱ्या कृषी धारकांच्या किंवा शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात होणाऱ्या बदलाचा अभ्यास करणे. आणि जर आर्थिक विकासात वाढ झाली नाही तर त्याची कारणे शोधुन, त्यावर उपाययोजना सुचविणे व राष्ट्रीयकृत बँकाच्या पीक कर्ज योजनेचा अभ्यास करुन पीक कर्ज योजना ही कृषी क्षेत्राच्या विकासास, कृषी धारकास अधिक लाभदायक कशी ठरेल ? हया संदर्भात उपाय सुचविणे / शिफारशी सुचविणे हा या संशोधनामागील महत्वपुर्ण हेतु आहे.

1.5 संशोधनाची उद्दिष्टये :-

1) शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती अभ्यासणे

2) तालुक्यातील पिक पध्दतीचे विवेचन करणे

3) राष्ट्रीयकृत बँकामार्फत दिल्या जाणाऱ्या पीक कर्जाचे प्रमाणअभ्यासणे

4) राष्ट्रीयकृत बँकांच्या पीक कर्ज योजनेमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात / कल्याणात होणाऱ्या बदलांचे विवेचन करणे.

1.6 संशोधनाची गृहितके :-

1) जिरायती शेतीचे प्रमाण आधिक आहे.

2) शेतकरी पंरपरागत पध्दतीने शेती व्यवसाय करतात.

3) शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती दयनीय आहे.

4) राष्ट्रीयकृत बॅकांच्या पीक कर्ज योजनेमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे.

5) राष्ट्रीयकृत बॅकांकडून मिळणाऱ्या पीक कर्जाचा पुरवठा अपूरा आहे.

1.7 संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन अभ्यास हा प्राथमिक व द्वितीयक माहितीवर आधारित आहे. नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती ही दयनीय असून ते जिरायती पध्दतीने अधिक प्रमाणात शेती व्यवसाय करतात. त्यामुळे संशोधनातून उत्पन्न, रोजगार व त्यांना शेती व्यवसायासाठी लागणाऱ्या वित्तपुरवठा हया संदर्भातील अभ्यास करण्यासाठी अनुसूची या तंत्राचा वापर केला असून ही अनुसूची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे संशोधन संदर्भातील गृहितकृत्ये लक्षात घेवून तयार करण्यात आली आहे. या संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यात सध्या एकुण 16 तालुके अस्तित्वात असून त्या 16 तालुक्यातील एकुण लहान मोठी खेडयांची संख्या 1600 च्या जवळ पास आहे. तर त्या गावापैकी 1310 गावात ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत तर ह्या 16 तालुक्यापैकी प्रत्येक तालुक्यातुन राष्ट्रीयकृत बँकाकडून पीक कर्ज घेणाऱ्या 25 पीक कर्जदाराकडून अनुसूचीच्या आधारे संशोधनासाठी माहिती संकलन करण्यात येणार आहे तर अशा 16 तालुक्यामधुन 400 पीक कर्जदाराकडून 400 अनुसूची भरुन घेण्यासाठी सहेतूक पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

1.8 नमूना निवड :-

महाराष्ट्र राज्यात एकूण सहा (6) प्रशासकीय विभाग असून इतर विभागाच्या तुलनेत मराठवाडा हा मागासलेला प्रशासकीय विभाग समजला जातो. तर मराठवाडयातील एकूण 8 जिल्हांपैकी नांदेड जिल्हा हा एक आहे. इतर जिल्हयाच्या तुलनेत नांदेड जिल्हयातील कृषी क्षेत्र हे अविकसित आहे. तर नांदेड जिल्हयात 16 तालुके आणि 1600 च्या जवळपास खेडी व त्या खेड्यापैकी 1310 ग्रामपंचायती आहेत. नांदेड जिल्हयातील शेती करण्याची पध्दती परंपरागत असून शेतकऱ्यांची, कृषीधारकांची स्थिती

दयनीय व मागासलेली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषीसाठी तसेच आपल्या आर्थिक विकासात वाढ करण्यासाठी वित्तपुरवठयाची आवश्यकता आहे. त्यानुसार नांदेड जिल्हयातील राष्ट्रीयकृत बँकाकडून ते विविध प्रकारचे पीक कर्ज घेताना दिसून येतात त्यामुळे त्यांच्या आर्थिक विकासात होणाऱ्या किंवा कल्याणात होणाऱ्या बदलाचा अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्हयात 15 राष्ट्रीयकृत बॅका आहेत. तर त्यांच्या एकूण मुख्य व उपशाखांची एकूण संख्या 92 एवढी आहे म्हणूनच ह्या एकूण राष्ट्रीकृत बॅका मार्फत शेतकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या पीक कर्जाचा पुरवठा आणि त्यातून शेतकऱ्यांच्या आर्थिक कल्याणतील बदलांचा अभ्यास करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात येणाऱ्या ग्रामपंचायत धारक एकूण गावांची संख्या लक्षात घेवून त्या गावांची प्रमाणशीर पध्दतीनुसार निवड करुन प्रत्येक तालुक्यातील 25 पीक कर्जदाराकडून अनुसूची भरुन घेऊन अशा 16 तालुक्तील 400 पीककर्जदाराकडून अनुसूची भरुन घेऊन त्यांच्याद्वारे प्राप्त होणाऱ्या माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

1.9 संशोधन व्याप्ती / क्षेत्र :-

नांदेड जिल्हयातील वास्तव्य करणाऱ्या कृषी धारकांनी किंवा शेतकऱ्यांनी राष्ट्रीयकृत बॅकांकडून घेतलेल्या पीक कर्ज योजनेमुळे शेतकऱ्यांच्या व कृषी क्षेत्राच्या आर्थिक विकासात होणाऱ्या बदलाचा अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्हा या कार्यक्षेत्राची निवड करण्यात आली आहे. नांदेड जिल्हयात एकुण लहान-मोठे असे 1600 गावे असून 1310 ग्रामपंचायती आहेत तर 15 राष्ट्रीयकृत बॅकांच्या विविध शाखा आणि त्यांच्या उपशाखा 92 आहेत. व हया बॅकांतर्फे देण्यात येणाऱ्या इतर कर्जाच्या योजनांपैकी केवळ "पीक कर्ज" हयाच योजना अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्हयातील 16 तालुक्यातील केवळ ग्रामपंचायत असलेले असे प्रमाणशिररीत्या 80 गावांची निवड करण्यात येणार आहे.

1.10 संशोधन विषयाच्या मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनात केवळ नांदेड जिल्ह्याचा संदर्भ घेवून अभ्यास करण्यात आला आहे. जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बॅकांच्या पीक कर्ज योजनेमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक कल्याणात होणाऱ्या वाढीचा अभ्यास यात करण्यात आला आहे. सदर संशेधनाद्वारे काढण्यात आलेले निष्कर्ष केवळ नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बॅकांच्या पीक कर्ज योजना व शेतकऱ्यांच्या आर्थिक कल्याणा संदर्भात आहेत. त्यामुळे ते इतर तालुक्यातील शेतकऱ्यांना लागु पडतीलच असे नाही. तसेच नांदेड जिल्ह्यातील इतर कृषी वित्तपुरवठा करणाऱ्या पतसंस्थांचा अभ्यास करण्यात आला नाही. तर केवळ नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बॅकामार्फत पीक कर्ज (crop loan) घेणाऱ्या शेतकऱ्यांचा, कृषी व्यवसाय धारकांचा अभ्यास यात करण्यात आला आहे.

1.11 दुय्यम सामग्री :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक सामग्रीसह, दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला असून यात नांदेड जिल्हयातील राष्ट्रीयकृत बॅकांचा अहवाल, पंचायत समिती, ग्रामपंचायत कार्यालयातील अहवाल तसेच जिल्हा सांख्यिकी कार्यालय नांदेड, महाराष्ट्र राज्य व नांदेड जिल्हा गॅझ ोटिअर, विविध ग्रंथालयातील विषयाला अनुसरुन उपलब्ध असलेली पुस्तके, मासिक, पाक्षिके, साप्ताहिके व वर्तमानपत्रे यांचा वापर करण्यात आला आहे. तसेच संशोधन विषयाला अनुसरुन यापुर्वी प्रकाशित झालेली संशोधनात्मक पुस्तके, शोधप्रबंधाचा, इंटरनेटचा उपयोग, संशोधनासाठी करण्यात आला आहे

प्रकरण आराखडा

प्रकरण पहिले

प्रस्तावणा व संशोधन पध्दती

प्रकरण दुसरे

संशोधन साहित्यांचा आढावा

प्रकरण तिसरे

नांदेड जिल्हा एक दृष्टिक्षेप

प्रकरण चौथे

कृषी पतपुरवठया बाबत शासकीय व राष्ट्रीकृत बॅकांची धोरण

प्रकरण पाचवे

नांदेड जिल्हयातील राष्ट्रीयकृत बॅकांची माहिती

प्रकरण सहावे

राष्ट्रीयकृत बॅकांची पीक कर्ज योजना व शेतकऱ्यांच्या आर्थिक कल्याणतील बदलांचे सांख्यिकीय विश्लेषण

प्रकरण सातवे

निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ सूची

1) ए.एस.खुसरो "**भारतीय नियोजन आणि आर्थिक विकास**" एस.ए.देशपांडे, वा.मुंजे, विद्या प्रकाशन, नागपूर सन 1989.
2) सदवी बी.एस. व वृंदा कशाळीकर "**भारतीय बॅक व्यवस्था**" मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, सन 1989.
3) बिलोली तालुका जणगणना अहवाल सन 2011
4) ए.डी.गोरवाला "**भारतीय अर्थव्यवस्था**" निर्मल भालेराव व देसाई निराली प्रकाशन, पुणे सन 2002.
5) डॉ.बी.बी.पहुरकर, एन.एम.साबळे, "**बॅकींगची तत्वे आणि ग्रामीण विकास,** पिंपळापूर प्रकाशन पुणे सन 2003
6) राजीव कुमार सिन्हा, बॅकींग चिंतन- अनुचिंतत कृषी क्षेत्र के विकास में संस्थागत ऐजसिंयोंका योगदान, जयपूर सन 2003.

7) सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती अहवाल, कुंडलवाडी सन 2004.
8) पुरवार ए.के.अर्थमंथन स्टेट बॅंक ऑफ इंडियांची वाटचाल सकाळ पेपर्स लि.प्रकाशन सन 2005
9) डॉ.शंकर तळेकर, डॉ.दिनकर टकले, "**पैसा व वित्तिय पध्दती**" चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद सन 2005.
10) डॉ.स.श्री.मु.देसाई, डॉ.निर्मल भालेराव "**भारतीय अर्थव्यवस्था**" , निराली प्रकाशन पुणे 2006.
11) **विद्यानाथन समिती इंडियन इकॉनॉमिक्स ईश्वर** सी.धिंग्रा, सुलतानचंद आणि सन्स, नवी दिल्ली 2006.

संशोधक

माधन बाबाराव हळदेकर
सामाजिकशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बी.बी.पावडे
प्राचार्य
एम.महिला महाविद्यलाय,
ता.जि.नांदेड